खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला : मा. मृणाल कुलकर्णी

# राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका माझ्यासाठी प्रेरणादायी

## अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचे मत

राजगुरूनगर : मालिका व चित्रपटसृष्टीच्या कारकिर्दीत अनेकदा केलेली राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्यातील शारीरिक व मानसिक कणखरतेमुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज घडले, असे मत अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी व्यक्त केले. त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कलाप्रवास' या विषयावर बोलत होत्या.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित होते.

मृणाल कुलकर्णी यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. विद्यार्थिनींचा स्वतःवर विश्वास आणि शिस्त असेल तर कोणत्याही क्षेत्रात करिअर करायला हरकत नाही, असे त्या म्हणाल्या. आजोबा गो. नी. दांडेकर आणि आई-वडिलांनी केलेला साहित्य - कलेच्या संस्काराने माझी जडणघडण झाली. आपल्या पालकांनी केलेल्या संस्कारांची जाणून ठेवून विद्यार्थ्यांनी करिअर करावे, असे त्यांनी सांगितले. स्वतःच्या फिटनेसचे रहस्य सांगताना सर्वांनी दररोज किमान ४० मिनिटे व्यायाम करावा, आहार चांगला ठेवावा असा त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचा मंत्र सांगितला. नाटक, मालिका, चित्रपट, वाचनाचा छंद, कौटुंबिक विषय, जाहिरात क्षेत्र, लेखन, सामाजिक कार्य अशा अनेक विषयांवरती त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. त्यांची मुलाखत डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी घेतली. सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार तनिष्का शेलार हिने मानले.



राजगुरुनगर : अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर.

# अजितदादांचे विचार पुढे नेऊया

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे आवाहन

इंदापूर : महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी रात्रंदिवस झटणारे, इंदापूर तालुक्याच्या विकासाची दूरदृष्टी असलेले दादा हरपल्याने राज्यासह इंदापूरचे मोठे नुकसान झाले आहे. ते कधीही न भरून निघणारे. दादांच्या मार्गी लावत. मी मिटिंगला असो वा नसो, इंदापूरचा कोणताही प्रश्न असला तरी दादांनी तो सोडवला. ग्रामीण भागाचा विकास कसा करता येईल, याचा बारकावा त्यांच्याकडे होता. बारामतीसह इंदापूर शहरासाठी काय

पुढारी

# राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका प्रेरणादायी

**अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांचे प्रतिपादन**

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

मालिका व चित्रपटसृष्टीतील कारकिर्दीत अनेकदा साकारलेली राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका माझ्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या शारीरिक व मानसिक कणखरतेमुळेच छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज घडले, असे प्रतिपादन अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत त्या बुधवारी (दि. २८) 'कलाप्रवास' या विषयावर बोलत होत्या. या वेळी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष अॅड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे आदी उपस्थित होते.

मृणाल कुलकर्णी यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. विद्यार्थिनींमध्ये



राजगुरुनगर येथील व्याख्यानमालेप्रसंगी अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचा सत्कार करताना मान्यवर.

स्वतःवर विश्वास आणि शिस्त असेल, तर कोणत्याही क्षेत्रात करिअर करता येते. पालकांनी दिलेल्या संस्कारांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी करिअरची वाटचाल करावी, असेही त्यांनी सांगितले.

दररोज किमान ४० मिनिटे व्यायाम करावा व संतुलित आहार घ्यावा, असा आरोग्याचा मंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. नाटक, मालिका, चित्रपट, वाचनाचा छंद, कौटुंबिक विषय, जाहिरात क्षेत्र, लेखन व सामाजिक कार्य अशा विविध विषयांवर त्यांनी मोकळेपणाने संवाद साधला. त्यांची मुलाखत डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी घेतली. सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी केले. परिचय डॉ. संजय शिंदे यांनी करून दिला, तर तनिष्का शेलार हिने आभार मानले.

My Pune Gramin Edition
Jan 31, 2026 Page No. 11
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका प्रेरणादायी : कुलकर्णी

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : मालिका व चित्रपटसृष्टीच्या कारकिर्दीत अनेकदा केलेली राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका माझ्यासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्यातील शारीरिक व मानसिक कणखरतेमुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज घडले, असे प्रतिपादन अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी केले.

त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळातर्फे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत (दि. २८ रोजी) 'कलाप्रवास' या विषयावर बोलत होत्या.



साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत मृणाल कुलकर्णी यांचा सन्मान करताना ॲड. राजमाला बुट्टेपाटील.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन.

यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित होते. मृणाल कुलकर्णी यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. विद्यार्थिनींचा स्वतःवर विश्वास आणि शिस्त असेल तर कोणत्याही क्षेत्रात करिअर करायला हरकत नाही, असे त्या म्हणाल्या. आजोबा गो. नी. दांडेकर आणि आई-वडिलांनी केलेला साहित्य - कलेच्या संस्काराने माझी जडणघडण झाली. आपल्या पालकांनी केलेल्या संस्कारांची जाण ठेवून विद्यार्थ्यांनी करिअर करावे, असे त्यांनी सांगितले. स्वतःच्या फिटनेसचे रहस्य सांगताना सर्वांनी दररोज किमान ४० मिनिटे व्यायाम करावा, आहार चांगला ठेवावा, असा आरोग्याचा मंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. नाटक, मालिका, चित्रपट, वाचनाचा छंद, कौटुंबिक विषय, जाहिरात क्षेत्र, लेखन, सामाजिक कार्य अशा अनेक विषयांवर त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. त्यांची मुलाखत डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी घेतली.

Hello Pune Gramin
Page No. 8 Feb 01, 2026
Powered by: erelego.com

केसरी
किरण खुडे (पत्रकार)

# राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका प्रेरणादायी : मृणाल कुलकर्णी

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** मालिका व चित्रपटसृष्टीच्या कारकीर्दीत अनेकदा केलेली राजमाता जिजाऊसाहेबांची भूमिका माझ्यासाठी प्रेरणादायी असून त्यांच्यातील शारीरिक व मानसिक कणखरतेमुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज घडले, असे प्रतिपादन अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कलाप्रवास या विषयावर त्या बोलत होत्या.



याप्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित होते.

मृणाल कुलकर्णी यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. विद्यार्थिनींचा स्वतःवर विश्वास आणि शिस्त असेल तर कोणत्याही क्षेत्रात करिअर करायला हरकत नाही, असे त्या म्हणाल्या.

स्वतःच्या फिटनेसचे रहस्य सांगताना सर्वांनी दररोज किमान ४० मिनिटे व्यायाम करावा, आहार चांगला ठेवावा असा त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचा मंत्र सांगितला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख